जनसंपर्क कक्ष
0 4 MAY 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शंभर सेकंद कृतज्ञतेचे

## जागृती पथनाट्याचा पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांना शुक्रवारी अभिवादन केले जाणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक जण सकाळी दहा वाजता १०० सेकंद आहे त्या ठिकाणी स्तब्ध राहून आपल्या राजाला अनोखी आदरांजली वाहणार आहे. या कार्यक्रमासाठी विविध संस्था, संघटनांनी जनजागृती सुरू केली आहे.

दि न्यू एज्युकेशन संस्थेमार्फत विविध ठिकाणी पथनाट्याद्वारे या कार्यक्रमासाठी जनजागृती केली जाणार आहे. या पथनाट्याचा शुभारंभ पालकमंत्री सतेज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या प्रमुख उपस्थितीत शाहू मिल येथे करण्यात आला. १०० सेकंद लोकराजासाठी, १०० सेकंद कृतज्ञतेचे हा आशय घेऊन पथनाट्य सादर केले जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी जिल्हा प्रशासनाने आकर्षक चित्रफीत तयार केली आहे. ही विविध माध्यमातून प्रसारित केली जात आहे. विविध संस्था, संघटनाही सोशल मीडियाद्वारे याबाबतची जनजागृती करत आहेत.

तरुण भारत

# विद्यापीठात राजर्षी शाहू स्मृती शताब्दी सप्ताहाचे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहास सोमवारी विशेष ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाने सुरूवात झाली. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि ज्येष्ठ शाहू संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रवेशद्वारात राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्यावतीने ग्रंथ प्रदर्शन भरवले असून यामध्ये ११५ ग्रंथ आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची चरित्रे, कागदपत्रे, छायाचित्रे आणि शाहूंशी निगडित अनेक दुर्मिळ ग्रंथांचा समावेश आहे. विद्यापीठाने प्रकाशित केलेले 'राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स"चे ९ खंड, राजर्षी शाहू केंद्रामार्फत सुरू केलेल्या राजर्षी शाहू साहित्य मालेंतर्गत प्रकाशित पुस्तके, संशोधकांनी लिहिलेली बहुविध भाषांतील चरित्रे, शासनातर्फे प्रकाशित राजर्षी शाहू चरित्राची साधने यांचा समावेश आहे. 'डॉ. जयसिंगराव पवार यांची शाहू चरित्र साधना" हे विशेष दालन डॉ. पवार यांच्या समग्र शाहूंविषयीच्या कार्याला समर्पित आहे. यामध्ये त्यांनी शाहू महाराजांविषयी लिहिलेली, संपादित केलेली तसेच देशी-विदेशी भाषांत अनुवादित पुस्तके आहेत. प्रदर्शन ७ मेपर्यंत सकाळी ११ ते ५ या वेळेत खुले आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, माजी कुलसचिव डॉ. राजेंद्र कांकरिया, डॉ. भारती पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# उद्यापासून लोकराजा स्टार्टअप व इनोवेशन फेस्टीवल

कोल्हापूर,ता.३०(प्रतिनिधी)

.................................

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १०० व्या स्मृतिदिनानिमित्त कृतज्ञता पर्व साजरे होत असून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठातर्फे 'लोकराजा स्टार्टअप व इनोवेशन फेस्टीवल'चे दि.२ मे ते ४ मे २०२२ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. ही माहिती शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक डॉ.एम.एस.देशमुख यांनी दिली आहे.

स्टार्टअप तसेच नवसंशोधक यांच्या उद्योगातील पुढील वाटचालीसाठी गुंतवणूकदार व नवउद्योजक यांच्यामध्ये दि.३ रोजी संवाद साधणेचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या फेस्टीवलमध्ये कोल्हापूर जिल्हा परिसरातील तमाम नवसंशोधकांनी व इच्छुकांनी सहभाग घ्यावा तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी यांनी सहभागी व्हावे व सदर कार्यक्रमास भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि शिवाजी विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू स्मृती सप्ताहास ग्रंथ प्रदर्शनाने प्रारंभ

कोल्हापूर, ता.३ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहास विशेष ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाने उत्साही प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि ज्येष्ठ शाहू संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. हे प्रदर्शन ७ मेपर्यंत सकाळी ११ ते ५ या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रवेशद्वारात राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले असून यामध्ये एकूण ११५ ग्रंथ समाविष्ट आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची चरित्रे, कागदपत्रे, छायाचित्रे आणि शाहू महाराजांशी निगडित अनेक दुर्मिळ ग्रंथांचा यात समावेश आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेले 'राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स'चे ९ खंड, राजर्षी शाहू केंद्रामार्फत सुरू करण्यात आलेल्या राजर्षी शाहू साहित्य मालेअंतर्गत प्रकाशित झालेली पुस्तके, शाहू महाराजांची विविध संशोधकांनी लिहीलेली बहुविध भाषांतील दुर्मिळ चरित्रे, महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित राजर्षी शाहू चरित्राची साधने यांचा समावेश सदर प्रदर्शनात आहे. 'डॉ. जयसिंगराव पवार यांची शाहू चरित्र साधना' हे विशेष दालन डॉ. पवार यांच्या समग्र शाहूंविषयीच्या कार्याला समर्पित असे आहे. यामध्ये त्यांनी शाहू महाराजांविषयी लिहीलेली, संपादित केलेली तसेच देशीविदेशी भाषांत अनुवादित झालेली पुस्तके समाविष्ट आहेत.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, माजी कुलसचिव डॉ. राजेंद्र कांकरिया, डॉ. भारती पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. नीलांबरी जगताप यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

04 MAY 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यजमान जैन विद्यापीठ विजेते

## शिवाजी विद्यापीठाला १७ पदके, दहावे स्थान

**बंगळूर : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२२ चे विजेतेपद यजमान जैन विद्यापीठाने पटकावले असून त्यांनी २० सुवर्ण, ७ रौप्य आणि ५ कांस्य पदके जिंकून विजेतेपद संपादले आहे. कौतुकाची बाब म्हणजे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने पदक तालिकेत दहावे स्थान पटकावले आहे. शिवाजी

**खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२२**

विद्यापीठाने ८ सुवर्ण, २ रौप्य आणि ७ कांस्य पदके जिंकली आहेत. बंगळूर या कर्नाटकच्या राजधानीत मंगळवारी या स्पर्धांचा शानदार समारोप केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या स्पर्धेत लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने दुसरा, पंजाब विद्यापीठाने तिसरा, गुरू नानक विद्यापीठाने चौथा, महर्षी दयानंद विद्यापीठाने पाचवा, पंजाबी विद्यापीठाने सहावा, कुरुक्षेत्र विद्यापीठाने सातवा, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणेने आठवा क्रमांक पटकावताना ८ सुवर्ण, १४ रौप्य व १७ कांस्य पदके जिंकली. मुंबई विद्यापीठाने नववा क्रमांक पटकावताना ८ सुवर्ण, ७ रौप्य आणि ७ कांस्य पदके जिंकली. त्यानंतर दहावा क्रमांक शिवाजी विद्यापीठाला मिळाला. एकूण १४२ विद्यापीठांनी यावेळी आपले पदकांचे खाते उघडले. स्पर्धेत एकूण २५९ सुवर्ण, २५८ रौप्य आणि ३३५ कांस्य पदके देऊन विविध खेळाडूंना गौरवण्यात आले. विशेष म्हणजे या स्पर्धेमध्ये विद्यापाठी पातळीवरील अनेक विक्रम नोंदले गेलेच, खेरीज राष्ट्रीय पातळीवरील दोन विक्रमही मोडीत काढले गेले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचे तीन राष्ट्रीय विक्रम

## एकूण १७ पदकांची कमाई

### खेलो इंडिया



कोल्हापूर, ता. ३ : बंगळुरू येथे झालेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने ८ सुवर्ण, २ रौप्य तर ७ कास्य पदकांसह तीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केले.

स्पर्धेत यजमान जैन विद्यापीठाने २० सुवर्ण, ७ रौप्य आणि ५ कास्य पदकांसह अव्वल स्थान पटकावले. पंजाबमधील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीने सर्वाधिक ५१ पदके जिंकली; परंतु १७ सुवर्णांसह दुसरे स्थान पटकावले. पंजाब विद्यापीठ तिसरे, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ प्रथम दहामध्ये राहिले. स्पर्धेत २०८ विद्यापीठांनी सहभाग नोंदवला होता. दुसऱ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सचा समारोप गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते झाला. स्पर्धेत २०८ विद्यापीठांमधील ३ हजार ९०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. शिवाजी विद्यापीठच्या ऋजुता खाडे हिने जलतरणमध्ये, विकास खोडके ११० मीटर अडथळा शर्यत तर सिद्धांत पुजारी याने तीन हजार मीटर स्टीपलचेसमध्ये राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केले. ४०० मीटर अडथळा शर्यतीत रोहन कांबळे याने सुवर्ण पटकावले; मात्र अवघ्या काही क्षणांमुळे त्याचा राष्ट्रीय विक्रम हुकला. संपूर्ण संघाचे व्यवस्थापक म्हणून रामचंद्र पाटील यांनी काम पाहिले.

सकाळ




कोल्हापूर : डी. बी. पाटील व्याख्यानमालेंतर्गत छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करताना डॉ. सुनीलकुमार लवटे.

# नवे शैक्षणिक धोरण पहाट स्वप्न : डॉ. लवटे

कोल्हापूर : ''नवीन शैक्षणिक धोरण हे पहाट स्वप्न आहे,'' असे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी सांगितले. डी. बी. पाटील अमृतमहोत्सवी व्याख्यानमाला समितीद्वारे श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउस आयोजित 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' यावर व्याख्यान झाले. डॉ. लवटे म्हणाले, ''नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे भारतातील पहिले शैक्षणिक धोरण आहे.

जे शिक्षणाचा सर्वंकष विचार करते. शिक्षणात मूलभूत बदल करणारे हे धोरण आहे. बालकांचा समग्र विचार सर्वप्रथमच या शैक्षणिक धोरणाने केला आहे. मूल जसं आहे, तसं स्वीकारून त्याला आकार देणे गरजेचं आहे. जेव्हा घरा-घरांतील मानसिकता बदलेल तेव्हाच भारत खऱ्या अर्थानं बदलेल.' प्रा. डॉ. आर. के. कामत म्हणाले, ''नवीन शैक्षणिक धोरण ही संधी आहे. त्याची योग्य अंमलबजावणी झाली नाही तर धोकाही आहे. या धोरणात सर्जनशीलता, सहयोग, चिकित्सक विचार आणि संवादावर भर दिला आहे.'' प्रा. विनय पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी ओळख करून दिली. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउसचे अध्यक्ष बी. जी. बोराडे अध्यक्षस्थानी होते. डॉ. मनीषा नायकवडी यांनी सूत्रसंचालन केले. वाय. एस. चव्हाण यांनी आभार मानले.

सकाळ



कोल्हापूर : रोजगाराची संधी यावर बोलताना हिरेन कुलकर्णी.

# कमला महाविद्यालयात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्र, महीका मुंबईतर्फे कमला महाविद्यालयात 'पदवीधर महिलांसाठी रोजगाराच्या संधी आणि क्षमतेची बांधणी' यावर कार्यशाळा झाली. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. 'महीका'चे संस्थापक हिरेन कुलकर्णी, सहसंस्थापक अनुपमा रामटेके यांनी विद्यार्थिनींसाठी बी.पी.ओ क्षेत्रात रोजगाराच्या संधी आहेत; मात्र त्यासाठी विविध क्षमता निर्माण केल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले. माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात जगभरात वाढणाऱ्या रोजगार संधीचा फायदा विद्यार्थिनींनी करून घ्यावा. आपले भवितव्य उज्वल करावे, असे डॉ. मुडेकर यांनी सांगितले. शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, शिवाजी विद्यापीठ सेंट्रल प्लेसमेंट समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांचे सहकार्य लाभले. डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम झाला. प्रा. डॉ. वर्षा मैदर्गी यांनी आयोजन केले. सचिन देठे, प्राची खाडे, शिवानी कागले, पूजा दुधगावकर उपस्थित होते.

तरुण भारत

# समाजाच्या विकासासाठी सकारात्मक राजकारणाची गरज

- ऑनलाईन व्याख्यानमालेत डॉ. प्रल्हाद माने यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाज आणि राजकारण यांचा सहसंबंध आहे. समाजामध्ये एकात्मता, ऐक्य, सलोख्याचे वातावरण निर्माण करणे ही आज प्रत्येकाची जबाबदारी झाली आहे. याचबरोबर समाजाच्या विकासासाठी सकारात्मक विचारांवर आधारीतच असलेले राजकारण केले जाणे नितांत गरजेचे आहे, असे प्रतिपादन समाजशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी केले.

आझादी का अमृत महोत्सव आणि शिवाजी विद्यापीठ हिरक महोत्सवाच्यानिमित्ताने राज्यशास्त्र विषयाअंतर्गत आयोजित 'भारतातील बदलते राजकीय अंतरंग' या ऑनलाईन व्याख्यानमालेअंतर्गत ते बोलत होते. 'भारतातील बदलते राजकारण आणि समाज' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. शिवाजी विद्यापीठातील दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राने व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते.

यावेळी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, सी. एस. कोतमिरे उपस्थित होते. प्रा. बी. आर. पाटोळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. एम. एम. मुजावर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. एस. डी. भोसले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी.पी.दावणे यांनी आभार मानले.